# धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
**राजन राजे**

संदर्भ क्र.________________ दिनांक : १२/११/२०१४

## मुख्यमंत्र्यांना जनहिताच्या १५ कलमी मसूदा सादर
# ‘धर्मराज्य पक्षा’चे धरणे आंदोलन संपन्न

**प्रतिनिधी**

दि. १२ – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जनहिताचा **१५ कलमी** मसूदा **‘धर्मराज्य पक्षा’**तर्फे सादर करण्यात आला आहे. तसेच मराठी गिरणी कामगारांना १ लाख रूपयांत **‘सदनिका’** द्या, मराठी **‘बेळगाव’**चे कन्नड **‘बेळगावी’** करण्याच्या ठरावाला विरोध करा, दलित अत्याचाराला कारणीभूत **‘जातव्यवस्था’** नष्ट करा, ‘किलबर्न’ कंपनीतील कामगारांना न्याय द्या, पाच मराठी पोलीस प्रशिक्षणार्थींच्या मृत्युची चौकशी करा आदी मागण्यांचे निवेदनही **धर्मराज्य पक्षा**चे महासचिव **अनिल ठाणेकर** यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांना दिले.

**‘धर्मराज्य पक्षा’तर्फे देण्यात आलेला जनहिताचा १५ कलमी मसूदा पुढीलप्रमाणे आहे :**

सर्वसामान्यांना परवडणारी मोफत आरोग्य व्यवस्था, २४ तास उपलब्ध होणारा वीज पुरवठा आणि स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठ्यासाठी प्राधान्य देणे, कंत्राटी पध्दत रद्द करून किमान २५ हजार मासिक वेतन आणि महागाईच्या प्रमाणात पगारवाढ देऊन उद्योग-व्यापार-शेती या क्षेत्रात बौध्दिक व शारिरीक रोजगार वृध्दीसाठी प्राधान्य देणे, दलालव्यवस्था नष्ट करून शेतमालाला योग्य भाव, जैविक शेतीला प्रोत्साहन देऊन त्यानुसार बि-बियाणे व खत पुरवठा करून कृषी उत्पादन वाढवून, ग्राहकांना थेट शेतकऱ्यांकडून स्वस्त व सकस अन्नधान्य/भाजीपाला पुरवठा. शेती सिंचनासाठी बांध-बंधाऱ्यांची निर्मिती, सामुदायिक शेती संरचना निर्मिती आदींना प्राधान्य देणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करून वाहतूक कोंडी दूर करून वेळ, श्रम, पैसा, मानवी संसाधन आणि प्रदूषण रोखण्यास प्राधान्य देणे, अनिल बोकिलप्रणित **‘अर्थक्रांती’** संकल्पना राबवून महागाईवर नियंत्रणास प्राधान्य, जनलोकपाल विधेयक राबवून आणि लोकायुक्तांना सर्वाधिकार देऊन भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यास प्राधान्य देणे, निवडणूक सुधारणा राबवून **‘राईट टू रिजेक्ट’** आणि **‘राईट टू रिकॉल’** आदी अधिकार देण्यास प्राधान्य देणे, मानव व निसर्गाच शोषण करणारी मोठ-मोठाली धरणे-जैतापूरसारखे, अणुऊर्जा प्रकल्प रद्द करून, सौरऊर्जासारखे पर्यायी ऊर्जानिर्मिती स्त्रोत निर्माण करून पर्यावरणाचे संरक्षण करण्यास प्राधान्य देणे, परप्रांतियांना संरक्षण देणाऱ्या अनधिकृत झोपड्यांचा कॅन्सर नष्ट करणे आणि सर्वांना परवडतील असे प्रत्येक कुटुंबाला **‘एक घर’** याप्रकरणी योजना राबविण्यास प्राधान्य देणे, महाराष्ट्रातल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि विद्यापिठीय अशा सर्वच पातळ्यांवर शिक्षणाची गुणवत्ता वाढवून ते कुशल-व्यवसायभिमुख करून जागतिक पातळीवर स्पर्धा करणारी शिक्षणव्यवस्था निर्माण करणे आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढवून राज्याला साक्षर करण्यास प्राधान्य देणे, लोकभाषा-राजभाषा-ज्ञानभाषा-व्यवहारभाषा म्हणून मराठी भाषेचे संवर्धन करणे, मराठी भाषेला तंत्रज्ञानाची जोड देणे, राज्यकारभार, प्रशासन-कारभार, न्यायालयीन कारभार आदी सर्व स्तरावर मराठी भाषेचा वापर अत्यावश्यक करणे. मराठी भाषा-समाज-संस्कृतीच्या संरक्षणाला व विकासाला प्राधान्य देणे, आरक्षणाच्या आडून मराठी समाजात दूही माजविण्यास बंदी आणणे, अहमदनगरमधील जावखेडा-खालसा गावात झालेल्या दलितांच्या निर्घृण हत्याकांडाच्या पार्श्वभूमिवर शाळा-महाविद्यालयांमधून जातीचा उल्लेख रद्द करून जातीविहिन **‘महाराष्ट्र समाज’** निर्माण करणे. दलितांवरील अत्याचाराच्या केसेस चालविण्यासाठी फास्टट्रॅक कोर्टाच्या निर्मितीस प्राधान्य देणे, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी महिला सबलीकरण योजना राबविणे, कार्यालयांत **‘विशाखा’** समित्यांच्या नियुक्त्या, महिला पोलीस दल वाढविणे, महिला अत्याचारांच्या केसेस चालविण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची निर्मिती, महिला प्रसाधनगृहांची निर्मिती यांना प्राधान्य देणे, लोकसंख्या वाढीस नियंत्रण करून लोकसंख्या विस्फोटाला आळा घालणे. दोन मुलांव्यतिरिक्त मुलांना जन्मास घालणाऱ्यांना शिक्षा देणारे विधेयक मंजूर करण्यास प्राधान्य देणे, मराठी खेळांना प्राधान्य देणारे धोरण राबवून कॅरम, कबड्डी, खो-खो, मल्लखांब या देशी खेळांना उत्तेजन, तरूणांना खेळण्यासाठी व शहराच्या निरोगी व्यवस्थेसाठी उद्याने-क्रीडांगणे-तलाव टिकवणे व नव्याने उभारण्यास प्रोत्साहन देण्यास प्राधान्य देणे. तसेच मराठी गिरणी कामगारांना १ लाख रूपयांत **‘सदनिका’** द्या, मराठी **‘बेळगाव’**चे कन्नड **‘बेळगावी’** करण्याच्या ठरावाला विरोध करा, दलित अत्याचाराचा विरोध करा आणि महाराष्ट्र **‘जातमुक्त’** करा, **‘किलबर्न इंजिनिअरींग’** कोनगाव-कल्याण, कंपनीतील कामगारांना न्याय द्या, पाच मराठी पोलीस प्रशिक्षणार्थींच्या मृत्युची चौकशी करा आदी मागण्याही मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आल्यात.

ए/एर०३, ‘पांचजन्य’-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस्
को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२,
ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, ‘पांचजन्य’, शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग,
द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०.
दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*“सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!”...*